**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.**
**मा.क्रिडा समिती**
**कार्यपत्रिका क्रमांक -१**
**<u>सभावृत्तांत</u>**

दिाांक - १६.०४.२०१२ वेळ - दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रिडा समितीची पहिली सभा (विशेष सभा) सोमवार, दिनांक १६.०४.२०१२ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस मा.अनिल कवडे,मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद,पुणे व खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. थोरात वनिता एकनाथ
२) मा. पांढरकर निलेश शंकरराव
३) मा. भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापू
४) मा. काळभोर वैशाली जालिंदर
५) मा. बोकड रामदास गेणभाऊ
६) मा. मोरेश्वर महादू भोंडवे
७) मा. अप्पा ऊर्फ संपत ज्ञानोबा पवार

याशिवाय मा. कदम - अति.आयुक्त, मा. चाकणकर - प्र.नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

( मा. क्रिडा समितीच्या सभापती पदाची निवडणुक पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवण्यात आली होती )

-----------

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी - (पिठासीन अधिकारी) - आजच्या विशेष सभेत क्रिडा समितीचेसभापती पदावर नेमणुक करणेचा विषय आहे त्यासाठी मा.विभागीय आयुक्त यांनी सभेचा पिठासीन अधिकारी म्हणुन माझी या ठिकाणी नेमणुक केलेली आहे.

( मा. प्र.नगरसचिव यांनी मा. नगरसचिव यांना मुदतीत प्राप्त झालेले नामनिर्देशन पत्र मा. पिठासीन अधिकारी यांचेकडे सुपूर्द केले. मा. पिठासीन अधिकारी यांनी त्याची छाननी केली )

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी - **(पिठासीन अधिकारी)** - मा.क्रिडा समितीचे सभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या एका नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात आली असुन ते नामनिर्देशन पत्र वैध ठरलेले आहे. सभापती क्रिडा समिती पदाकरिता वैधपणे नामनिर्देशित केलेल्या उमेदवाराचे नाव पुढीलप्रमाणे आहे.

१) थोरात वनिता एकनाथ

उमेदवारास १५ मिनीटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस पिठासीन अधिकारी यांचेकडे देऊन त्याची उमेदवारी मागे घेता येईल अशी तरतुद असल्याने त्याप्रमाणे १५ मिनीटांचा अवधी देणेत येत आहे.

( मा. पिठासीन अधिकारी यांनी उमेदवारी मागे घेणेसाठी दिलेला दु.२.०२ ते दु.२.१७ हा १५ मिनीटांचा कालावधी संपला)

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी - **(पिठासीन अधिकारी)** उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेल्या १५ मिनीटांच्या अवधीमध्ये उमेदवारी मागे घेतलेली नसल्याने मा. क्रिडा समिती सभापती पदाची निवडणूक लढविणाऱ्या **मा. थोरात वनिता एकनाथ** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

ठराव क्रमांक - १ विषय क्रमांक - १
दिनांक - १६.४.२०१२ विभाग - नगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रिडा समिती सभापती पदासाठी एक नामनिर्देशन पत्र मुदतीत दाखल झालेले असुन वैध ठरलेले आहे. त्यामध्ये मा.क्रिडा समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या मा.थोरात वनिता एकनाथ या एकच रितसर नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा. थोरात वनिता एकनाथ** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रिडा समितीचे **सभापती** पदावर रितसर वैधरित्या निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

सही/-
**(अनिल कवडे)**
मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे जिल्हापरिषद
पिठासीन अधिकारी
क्रिडा समिती (विशेषसभा)

---------

(नवनिर्वाचित सभापती **मा. थोरात वनिता एकनाथ** यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले.)

---------

**मा.प्र.नगरसचिव** -विषय क्रमांक २ - मा.क्रिडा समितीच्या उपसभापतींची नेमणुक करणे. मा.क्रिडा समितीचे उपसभापती पदासाठी एकही नामनिर्देशन पत्र मुदतीत दाखल झालेले नाही.

ठराव क्रमांक - २ विषय क्रमांक - २
दिनांक- १६/०४/२०१२
सूचक - मा.शांताराम भालेकर अनुमोदक - मा.वैशाली काळभोर

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रिडा समितीच्या, उपसभापती पदासाठी एकही नामनिर्देशन पत्र मुदतीत दाखल झालेले नसल्याने मा. क्रिडा समितीच्या उपसभापतीची नेमणुक मा. सभापती निश्चित करतील त्या विशेष सभेत करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक :- ३ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- १६.०४.२०१२
सूचक :- मा.निलेश पांढरकर अनुमोदक :-मा.मोरेश्वर भोंडवे

मा.क्रिडा समितीची सभा प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी दुपारी ४.०० वाजता विशेष समिती सभागृहात भरविण्यात यावी तथापि सदर दिवशी कार्यालयास सुट्टी/सुट्ट्या असलेस त्या सुट्टी/सुट्ट्यानंतर येणारे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी ४.०० वाजता सभा भरविण्यात यावी. तसेच कोणीही सन्मा.सदस्य उपस्थित नसल्याने होऊ न शकणारी सभा मा.सभापती निश्चित करतील त्या दिवशी व त्यावेळी भरविण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(**थोरात वनिता एकनाथ**)
सभापती
क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ ५६८ /१२
दिनांक - १६/०४/२०१२ चे लगत

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.